संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

वर्ष : ६ वे ● ● अंक : १०६ ● ● रविवार दि. ०३ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली समेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. समेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

# भाजपाची १६ राज्यांमधील १९५ उमेदवारांची यादी जाहीर, पंतप्रधान मोदी वाराणसीतून लोकसभा लढवणार

**नवीदिल्ली:माणदेश एक्सप्रेस**

भारतीय जनता पार्टीने लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. भाजपाचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी पत्रकार परिषद घेऊन १६ राज्यांमधील १९५ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये सर्वाधिक उत्तर प्रदेशमधील ५१ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपाचे पहिले उमेदवार असून ते त्यांच्या वाराणसी मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. भाजपाने पहिल्या यादीत २८ महिलांना उमेदवारी दिली आहे.

विनोद तावडे यांनी भाजापाच्या उत्तर प्रदेशमधील ५१, पश्चिम बंगालमधील २०, मध्य प्रदेशमधील २४, गुजरातमधील १५,





राजस्थानमधील १५, केरळमधील १२, तेलंगणामधील ९, आसाममधील ११, झारखंडमधील ११, छत्तीसगडमधील ११, दिल्लीमधील ५, जम्मू काश्मीरमधील २, उत्तराखंडमधील ३, अरुणाचल प्रदेशमधील २, गोव्यातील १, त्रिपुरामधील १, अंदमान निकोबारमधील १ आणि दिव-दमणमधील एका उमेदवाराच्या नावाची घोषणा केली. पहिल्या यादीत महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराचं नाव नाही.

पहिल्या यादीत ३४ विद्यमान मंत्र्यांना पुन्हा एकदा उमेदवारी देण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू अरुणाचल प्रदेश पश्चिम या मतदारसंघातून निवडणूक लोकसभा निवडणूक लढवतील. तर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दुसऱ्यांदा गांधीनगर लोकसभेची जागा लढवणार आहेत. दरम्यान, यादी जाहीर करण्यापूर्वी विनोद तावडे यांनी सांगितलं की, २९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय निवडणूक समितीची बैठक पार पडली. या बैठकीत भाजपाच्या पहिल्या १९५ उमेदवारांची नावं निश्चित करण्यात आली आहेत. देशातील १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील उमेदवारांची यादी आज (२ मार्च) जाहीर करत आहोत.

मनसुख मांडविया पोरबंदरमधून, राजनाथ सिंह लखनौमधून, जितेंद्र सिंह उधमपूरमधून, किरेन रिजिजू अरुणाचल प्रदेश पूर्वमधून, सर्वानंद सोनोवाल आसामच्या डिब्रूगढमधून, संजीव बालियान मुज्जफरनगरमधून लोकसभा निवडणूक लढवतील. गुजरातच्या कच्छमधून विनोद चावडा, भरुचमधून मनसुख बसावा, नवसारीमधून सी. आर. पाटील लोकसभेच्या रिंगणात उतरले आहेत. तर भाजपाने छत्तीसकडच्या कोरबामधून सरोज पांडेय, दुर्गमधून विजय बघेल, रायपूरमधून बृजमोहन अग्रवाल लोकसभेच्या रिंगणात उतरवलं आहे. तर, जम्मूमधून जुगल किशोर शर्मा हे भाजपाचे उमेदवार आहेत. हजारीबागमधून मनीष जयस्वाल निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

दिल्लीतल्या लोकसभेच्या आठपैकी पाच जागांवर भाजपाने त्यांचे उमेदवार जाहीर केले आहेत. प्रवीण खंडेलवाल यांना चांदणी चौकातून, मनोज तिवारींना उत्तर-पूर्व दिल्ली, बांसुरी स्वराज यांना मध्य दिल्ली, कमलकित सहरावत यांना पश्चिम दिल्ली आणि रामवीर बिधुडी यांना दक्षिण दिल्लीतून लोकसभेचं तिकीट देण्यात आलं आहे.

# उष्णतेच्या लाटांसह यंदाचा उन्हाळा कडक

## तीन महिन्यांसाठी हवामान विभागाचा अंदाज काय?

**पुणे : माणदेश एक्सप्रेस**

यंदा उन्हाळ्याची तीव्रता जास्त जाणवणार आहे. मार्च ते मे या तीन महिन्यांत देशभरात तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदवले जाण्याची, तर महाराष्ट्रासह दक्षिणेतील राज्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी मार्च ते मे या कालावधीसाठीच्या हवामानाचा अंदाजाची पत्रकार परिषदेत माहिती दिली. पॅसिफिक महासागरात एल निनो स्थिती सक्रिय होण्यास गेल्या वर्षी सुरुवात झाली होती. तसेच ही स्थिती मेपर्यंत कायम राहण्याचा अंदाज जागतिक प्रारूपांकडून वर्तवण्यात आला



होता. त्यानुसार आता एल निनोची तीव्रता कमी होऊ लागली आहे. एल निनो मोसमी पावसाच्या सुरुवातीला संपुष्टात येईल. हिंदी महासागरातील इंडियन ओशन डायपोल हा वातावरणीय घटक मार्च ते मे या काळात तटस्थ होईल, असे डॉ. महापात्रा यांनी सांगितले.

एल निनोची तीव्रता आता कमी होऊ लागली असली, तरी त्याचा परिणाम तापमान वाढण्यावर होणार आहे. त्यामुळे मार्च ते मे या कालावधीत तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. यंदाच्या उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटा सरासरीपेक्षा जास्त येऊ शकतात. महाराष्ट्र, ओडिशा यांच्यासह दक्षिणेतील तेलंगणासारख्या राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटा येऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे, असे डॉ. महापात्रा यांनी स्पष्ट केले.


देशभरात मार्चमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचाही अंदाज आहे. सन १९७१ ते २०२० या कालावधीत देशभरातील मार्चमधील पावसाची सरासरी २९.९ मिलीमीटर आहे. त्यामुळे यंदा मार्चमध्ये सरासरीच्या ११७ टक्के पावसाची शक्यता आहे. तसेच मार्चमध्ये उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता आहे, असे डॉ. महापात्रा यांनी सांगितले.

# आटपाडीत श्री साई कृषी उद्योग फर्मचे होणार उद्घाटन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी येथे आज दिनांक ०३ रोजी श्री साई कृषी उद्योग समुहाच्या दुसऱ्या शाखेचा उद्घाटन सोहळा सौ.मीनाक्षी व श्रीधर सीताराम विभूते यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यासाठी प्रमुख उपस्थित म्हणून सांगली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुहास बाबर, सांगली जिल्हा बँकेचे संचालक व जिल्हा



सुहास बाबर

नियोजन समितीचे सदस्य तानाजीराव पाटील, पुणे येथे



तानाजीराव पाटील

उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असणारे निलप्रसाद चव्हाण, प्रगतशील बागायतदार दत्तात्रय कोळवले उपस्थित राहणार आहेत.

तरी सदर उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक तुषार विभूते व सौरभ विभूते यांनी केले आहे. उद्घाटन कार्यक्रम हा आटपाडी नगरपंचायत शेजारी, बाजार पटांगण या ठिकाणी आज दिनांक ०३ रोजी सकाळी १०.०० संपन्न होणार आहे.

# समूह शाळांसाठी राज्यभरातून ७०० प्रस्ताव

***पुणे : माणदेश एक्सप्रेस***


कमी पटसंख्येच्या शाळांच्या समायोजनातून समूह शाळा (क्लस्टर स्कूल) निर्माण करण्यासाठी राज्यभरातून सुमारे ७०० प्रस्ताव आले आहेत. त्यात साधारण १९०० शाळांचे समायोजन करून या समूह शाळा निर्माण करणे प्रस्तावित आहे. शिक्षण विभागाने राज्यातील शून्य ते २० विद्यार्थी पटसंख्येच्या शासकीय शाळांचे समायोजन करून नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ आणि पुणे जिल्ह्यातील पानशेत या समूह शाळांच्या धर्तीवर समूह शाळा निर्मितीचे प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत मागवले होते. त्यासाठी शिक्षण विभागाने ३१ ऑक्टोबरची मुदत दिली होती. राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून सुमारे ७०० प्रस्ताव आले आहेत.साधारण १९०० शाळांचे समायोजन होणार आहे. प्रस्ताव येणे म्हणजे समायोजन होणे असे नसते. प्रस्तावांची योग्य छाननी करून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. बहुतांशी दुर्गम भागात आणि आदिवासी भागात समायोजन होणार नाही, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली. कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या विकासात अडचणी येतात. मात्र, समूह शाळांचा फायदा विद्यार्थ्यांना एकूणच शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी होणार आहे. समूह शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध केल्या जातील.

# कोल्हापूरचे कला, सांस्कृतिक वैभव फुलणार

***कोल्हापूर:माणदेश एक्सप्रेस***

कोल्हापूरच्या कला, सांस्कृतिक वैभव फुलवणारे दोन महत्त्वाचे शासन निर्णय शुक्रवारी घेण्यात आले. शिवकालीन शस्त्रांचे जतन व संवर्धन करण्याच्या ४३ लाख रुपयांच्या निविदेस मान्यता देण्यात आली आहे. तर, चंद्रकांत मांडरे कलासंग्रहासाठी सव्वा कोटी रुपयांच्या अधिक खर्चाच्या निविदेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राज्य शासनाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा या अंतर्गत १३



राज्यसंग्रहालयातील शिवकालीन शस्त्रांचे जतन व संवर्धन करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार कोल्हापूर संग्रहालय व लक्ष्मी विलास पॅलेस (राजर्षी शाहू जन्मस्थळ) या संग्रहालयातील १३१ शिवकालीन शस्त्रांचे जतन व संवर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी आज के. आर्ट कंजर्वेशन लॅबोरेटरी, कळवा ठाणे यांची एक टक्के कमी दराची म्हणजे ४३ लाख रुपयांच्या निविदेस मान्यता देण्यात आली आहे.

सिने अभिनेते, चित्रकार चंद्रकांत मांडरे यांच्या नावाचे संग्रहालय असून त्याचे नूतनीकरण व दालनाचा विकास करण्याकरिता ओसवाल कन्स्ट्रक्शन सातारा यांनी ३ कोटी ५५ लाख रुपयांची निविदा सादर केली होती. तथापि अधिक दराचे निविदा व वस्तू सेवा कर यामधील वाढ गृहीत धरून आज राज्य शासनाने ४ कोटी ७१ लाख इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. या निर्णयाने कोल्हापुरातील कला वैभवात भर पडण्यास मदत झाली आहे, अशी प्रतिक्रिया विश्वस्त विश्वास काटकर यांनी व्यक्त केली.

# २०४७ पर्यंत भारत निश्चित विकसित होईल

## प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले : महिला महाविद्यालयात इकॉनॉमिक्स असोसिएशनच्या वतीने व्याख्यान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सातारा : भारत महासत्ता करण्याचे आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्याला सर्वच क्षेत्रात सर्वांगीण प्रगती करावी लागेल. आपले २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याचे आपले उद्दीष्ट साध्य करण्यासाठी आव्हाने स्वीकारून पुढे जाण्याची तयारी युवा पिढीला ठेवावी लागेल, असे प्रतिपादन श्रीमंत बाबासाहेब देशमुख आटपाडी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजीराव भोसले यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग व शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विकसित भारत २०४७ : संधी आणि आव्हाने' या





सातारा : 'विकसित भारत २०४७ : संधी आणि आव्हाने' या विषयावरील विशेष व्याख्यानात बोलताना प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले

विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या ऑडिट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, अखिल भारतीय अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रो.डॉ.अनिलकुमार वावरे, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह प्रा.डॉ. संजय धोंडे, उपप्राचार्य प्रो.डॉ.एस.एस.पवार, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.प्रकाश टोणे, हिंदी विभागप्रमुख प्रो.डॉ. जी.एस.भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.भोसले म्हणाले, देशाची लोकसंख्या हा आपल्या समोरील मोठा प्रश्न आहे. परंतु याकडे प्रश्न म्हणून न बघता उपलब्धी म्हणून पहावे लागेल.दरडोई उत्पन्न वाढले तरी गरिबीचा दर कमी करण्याची प्रयत्न आवश्यक आहेत.प्रशासनात पारदर्शकता असणे, भ्रष्टाचार मुक्त भारत होणे, आवश्यक आहे. ही आव्हाने पेलण्यासाठी युवा पिढीवर अधिक जबाबदारी आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रकाश टोणे यांनी केले. आभार डॉ.गजानन खामकर यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. सुनिल गोंड व मोनिका जाधव यांनी केले.यावेळी प्रा.निरंजन फरांदे, प्रा. राम कवितके, डॉ.एन.डी.बनसोडे, डॉ. नानासाहेब आवताडे उपस्थित होते.

# फडणवीसांशी गप्पा, शिंदेंची घेतली गाठ; सुप्रिया ताईंची अजितदादांकडे पाठ, नजरानजरही टाळली

***बारामती: माणदेश एक्सप्रेस***

बारामतीच्या विद्या प्रतिष्ठानच्या आवारात नमो रोजगार मेळाव्याला सुरुवात झाली आहे. या सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, स्थानिक खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि अनेक मंत्री उपस्थित आहेत. या मेळाव्याच्या निमित्तानं शरद पवार आणि अजित पवार एका व्यासपीठावर आले आहेत.

नमो रोजगार मेळाव्यासाठी उभारण्यात आलेल्या मंचावर सर्वप्रथम स्थानिक खासदार सुप्रिया सुळे पोहोचल्या. त्यानंतर तिथे एकनाथ शिंदे, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस मंचावर आले. सुळेंनी शिंदे यांचं नमस्कार करुन हसत स्वागत केलं. त्यांच्या शेजारीच अजित पवार उभे होते. पण सुळेंनी त्यांच्याकडे बघणंही टाळलं. शिंदे आणि अजित पवारांच्या मागून त्या पुढे सरकल्या.





# बालविवाह रोखण्यासाठी विवाहकार्यात सहभागी होणाऱ्यांवरही कारवाई करा- रुपाली चाकणकर

**कोल्हापूर:माणदेश एक्सप्रेस**

बालविवाह रोखण्यासाठी विवाहकार्यात सहभागी असणाऱ्या सर्वांवर कारवाई करा. लग्नपत्रिका छापणारे प्रिंटिंग प्रेस मालक, विवाह होणारे मंगल कार्यालय व समाज मंदिरांबरोबरच त्या गावचे सरपंच व ग्रामसेवकांवरही कारवाई करा, अशा सूचना देवून हे निर्देश तात्काळ सर्वांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी दिल्या.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात बैठक झाली, यावेळी पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, महानगरपालिका उपायुक्त साधना पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास) शिल्पा पाटील, जिल्हा महिला बालविकास अधिकारी एस.एस. वाईंगडेतसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या, जिल्ह्यात अद्याप महिला तक्रार निवारण समित्या स्थापन न झालेल्या आस्थापनांनी तात्काळ समित्या स्थापन करुन तसा अहवाल सादर करावा. सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये स्वच्छतागृहे स्वच्छ असल्याची खात्री करा. बेपत्ता महिला होण्याची प्रकरणे गंभीर असून यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. महिलांची छेडछाड, युवकांमधील व्यसनाधीनता व युवकांशी संबंधित गुन्हे रोखण्यासाठी समुपदेशनावर भर द्या. सोशल मीडियाच्या वापरामुळेही युवकांमधील गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे पालकांनी मुलांशी संवाद वाढवणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

बालविवाह, बेपत्ता महिला, मुलींमधील व्यसनाधीनता, कौटुंबिक हिंसाचार, छेडछाडीच्या घटनांचे प्रमाण कमी होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले आहेत. पण महिलांवरील गुन्हे रोखण्यासाठी नागरिकांनीही सामाजिक बांधिलकी म्हणून एकजुटीने पुढे यावे, असे आवाहन करुन महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचे प्रमाण कमी करुन महिला दिन हा खऱ्या अर्थाने वर्षभर साजरा व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना टाळण्यासाठी भरोसा सेल महत्वपूर्ण कामगिरी करत असून कौटुंबिक समस्या असणाऱ्या महिलांनी भरोसा सेलशी तर संकटात अडकलेल्या महिलांनी निर्भया पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहन करुन जिल्ह्यातील निर्भया पथकाच्या कामाचे त्यांनी कौतुक केले.नोकरी करणाऱ्या महिलांसाठीची वसतिगृहे, वन स्टॉप सेंटरची सद्यस्थिती, जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या तक्रार निवारण समित्या, महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे, बेपत्ता महिला व सापडलेल्या महिला, महिलांवरील हल्ले व हिंसाचाराच्या घटना, हरवलेली व सापडलेली बालके, भरोसा सेल,



निर्भया पथक, गर्भलिंग निदान व गर्भपात रोखण्यासाठी उपाययोजना व करण्यात आलेली कारवाई या विषयींचा सविस्तर आढावा चाकणकर यांनी घेतला.जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्यासह संबंधित विभागांनी संबंधित विभागांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

निर्भया पथकाचे मोबाईल क्रमांक-

कोल्हापूर शहर विभाग - ९४०५३८०१३३, जयसिंगपूर विभाग ९४०५०१६१३३, गडहिंग्लज विभाग - ९४०४९१२१३३, करवीर विभाग - ९४०५३८०१३३, इचलकरंजी विभाग,- ९४०५३०१३३, शाहूवाडी विभाग - ९०६७९६९३९३ असे असून संकटात सापडलेल्या महिला, मुलींनी या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी केले.

# दत्त कारखान्याच्या क्षारपड जमीन सुधारणा पथदर्शी प्रकल्पावर शासनाकडून शिक्कामोर्तब; नापीक जमिनीवर पिकांची हिरवाई फुलली

**कोल्हापूर : माणदेश एक्सप्रेस**

श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या वतीने सादर केलेल्या, शिरोळ तालुक्यातील सात क्षारपड जमीन सुधारणा संस्थेमार्फत १५४५ हेक्टर क्षेत्रावर क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्प राबवण्याच्या प्रस्तावास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. यानुसार राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून शेडशाळ, अर्जुनवाड, कवठेसार, गणेशवाडी, कुटवाड, हसूर, घालवाड या गावांमध्ये सच्छिद्र निचरा प्रणालीचा वापर करून क्षारपड जमीन सुधारणा कार्यक्रम राबविण्याकरिता ९ कोटी ४५ लाख ५४ हजाराचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

या प्रकल्पांतर्गत प्रति हेक्टरी ६० हजार रुपये लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट वर्ग करण्यात येणार आहेत. मुख्य अभियंता तथा सहसचिव सुनील काळे यांच्या सहीने या प्रस्तावास मंजुरी दिली असल्याची माहिती, श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, उद्यानपंडित गणपतराव पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

गणपतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री दत्त साखर कारखान्याच्या मार्फत २०१६ पासून शिरोळ व परिसरातील क्षारपड जमीन सुधारणा करण्यासाठी वारंवार प्रयत्न केले जात आहेत. क्षारपड मुक्ती संदर्भात शेतकऱ्यांच्या बैठका घेणे, जनजागृती करणे, त्यांना एकत्रित करून संस्था स्थापन करणे, तसेच बँकांच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देणे, यासाठी स्वतः पुढाकार घेऊन काम करण्यात आले आहे. याचाच भाग म्हणून आतापर्यंत तालुका व परिसरातील ८५०० एकरावर क्षारपड मुक्तीचे काम झाले असून ३५०० एकरावर प्रत्यक्षात शेतकरी उत्पादन घेत आहेत.

या प्रकल्पात सहभागी असणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत, अनुदान मिळविण्यासाठी श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या वतीने मृद व जलसंधारण विभागामार्फत राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर केला होता. यामध्ये शिरोळ तालुक्यातील एकूण दहा हजार हेक्टर पाणथळ क्षारपड जमिनीपैकी शेडशाळ, गणेशवाडी, अर्जुनवाड, कवठेसार, घालवाड, बुबनाळ, औरवाड, कुटवाड, हसूर या गावांमध्ये सच्छिद्र निचरा प्रणालीद्वारे सुमारे १९१० हेक्टर क्षारपड जमीन सुधारणा करण्याबाबत ५९ कोटी ४५ लाख प्रकल्प किमतीचा प्रस्ताव सादर केला होता. यास राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीने केंद्र शासनाची मंजुरी घेण्याच्या अटीच्या अधीन राहून मंजुरी दिली होती. त्यानुसार दि. २९ जुलै २०२१ रोजी केंद्र शासनास सदर प्रकल्पाचा प्रस्ताव सादर केला होता. केंद्र शासनाने दि. १ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या पत्रान्वये सन २०१८-१९ मधील राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत या उप योजनेअंतर्गत अखर्चित असलेला २ कोटी १९ लाखाचा निधी (यामध्ये केंद्र हिस्सा एक कोटी



३२ लाख आणि राज्य हिस्सा ८७ लाख रुपये) प्रकल्पासाठी खर्च करण्यासही मान्यता दिली होती.

या पार्श्वभूमीवर दत्त कारखान्याच्या १९१० हेक्टर क्षेत्रावरील प्रकल्प राबविण्याबाबत प्रशासकीय मान्यता दिली गेली आहे. या शासन निर्णयानुसार यापूर्वी ३६५ हेक्टर क्षेत्रासाठी योजना राबविण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित १५४५ हेक्टर क्षेत्रासाठी योजना राबविण्यासाठी राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीच्या ३४ व्या बैठकीत ९ कोटी ४६ लाख रुपये किमतीची उर्वरित कामांमधून राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये रुपांतरित करून हा निधी वापरण्यात येणार आहे. शेडशाळ येथील ३९४ हेक्टर, अर्जुनवाड- ३६६.७३ हेक्टर, कवठेसार- १३० हेक्टर, गणेशवाडी - २३४ हेक्टर, कुटवाड - ८५.४७ हेक्टर, घालवाड - १७७.८० हेक्टर व औरवाड १५७ हेक्टर या गावातील एकूण १५४५ हेक्टर क्षेत्रावर सच्छिद्र निचरा प्रणालीचा वापर करण्यासाठी वरील निधी मंजूर झाला आहे. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांनी स्वनिधीतून प्रक्षेत्र विकास, बांध बंधिस्ती, पाण्याचा पाट, जमिनीस आकार देणे, भूसुधारक, हिरवळीची खते, उसाचे बेणे, खते व औषधे आदींचा खर्च करायचा आहे तर सच्छिद्र निचरा प्रणालीसाठी प्रति हेक्टरी ६० हजार रुपये अर्थसहाय्य शेतकऱ्यांना मिळणार आहे.

**असा आहे प्रकल्प**

क्षारपड जमीन सुधारण्यासाठी सात गावांमध्ये स्थापन केलेल्या संस्था व अनुदान रक्कम खालील प्रमाणे आहे:- अन्नदाता बहुउद्देशीय क्षारपड जमीन सुधारणा संस्था शेडशाळ- २ कोटी ३६ लाख ४० हजार. अर्जुनेश्वर बहुउद्देशीय क्षारपड जमीन सुधारणा संस्था अर्जुनवाड - २ कोटी २० लाख ३८ हजार. कवठेसार बहुउद्देशीय क्षारपड संस्था कवठेसार - ७८ लाख, कृषी संजीवनी बहुउद्देशीय क्षारपड जमीन संस्था गणेशवाडी- १ कोटी ४० लाख ४० हजार. श्री नरसिंह बहुउद्देशीय क्षारपड जमीन संस्था कुटवाड हसूर - ५१ लाख २८ हजार. श्री घोलेश्वर बहुउद्देशीय क्षारपड जमीन सुधारणा संस्था घालवाड - १ कोटी ६ लाख ६८ हजार. औरवाड बुबनाळ बहुउद्देशीय क्षारपड जमीन सुधारणा संस्था - ९४ लाख २० हजार आणि प्रशासकीय खर्च १८ लाख ५४ हजार रुपये धरून ९ कोटी ४५ लाख ५४ हजाराचा निधी प्रति हेक्टरी ६० हजार प्रमाणे मंजूर करण्यात आला आहे.

**दत्त पॅटर्नचे यश**

गणपतराव पाटील यासंदर्भात बोलताना म्हणाले, श्री दत्त कारखान्याच्या वतीने करण्यात येत असलेल्या क्षारपड मुक्तीच्या 'श्री दत्त पॅटर्न'ची आणि शिरोळ आणि परिसरात सुरू असलेल्या क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्पाची शासनाने दखल घेऊन देशपातळीवरचा नाविन्यपूर्ण प्रकल्प म्हणून इतका मोठा निधी मंजूर झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अनेक शेतकऱ्यांनी आपली जमीन सुधारण्यासाठी स्वखर्चातून तसेच कर्ज काढून सच्छिद्र निचरा प्रणाली योजना राबवली होती व राबवित आहेत. शासनाकडून या मिळालेल्या अनुदानामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. तसेच शिल्लक असलेल्या क्षारपड जमीन सुधारण्यासाठीही शेतकऱ्यांना नवे बळ मिळून शिरोळ तालुका आणि परिसर क्षारपडमुक्त नक्कीच होईल अशी आशा वाटते. या प्रकल्पासाठी सी. एस. एस. आर. आय. कर्नालचे डॉ. बुंदेला व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत शेती संशोधन केंद्र कसबे डिग्रजचे डॉ. श्रीमंत राठोड यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले. तसेच या राष्ट्र उभारणीच्या कामात सर्व शासकीय अधिकाऱ्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे.

# मराठा आंदोलक विनोद पाटील छ. संभाजीनगरमधून लोकसभा लढवणार! शिंदे गटाकडून उमेदवारी?

***मुंबई:माणदेश एक्सप्रेस***



मराठा आरक्षणासाठी लढणारे मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक आणि न्यायालयात याचिका दाखल करणारे विनोद पाटील आता राजकारणाच्या मैदानात उतरणार आहेत. विनोद पाटील हे छत्रपती संभाजीनगर मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. त्यांनी स्वतःच याबाबतची घोषणा केली आहे. विनोद पाटील म्हणाले, मराठा आरक्षणासाठी सर्व प्रकारची लढाई आम्ही लढलो आहे. आता आम्हाला वाटतंय की, संसदीय पद्धतीने लढाई लढावी लागेल. समाजाला आता याच मार्गाने न्याय देता येईल असं आम्हा सर्व मराठा आंदोलकांना वाटतंय. त्यामुळेच माझ्या सर्व सहकाऱ्यांनी मला लोकसभा निवडणूक लढवण्याचा अग्रह केला आणि मीसुद्धा निवडणूक लढवण्यास सज्ज आहे.

विनोद पाटील म्हणाले, मराठा आरक्षणासाठी आम्ही रस्त्यावरची लढाई लढलो, न्यायालयीन लढाई लढलो. परंतु, आता आमच्या लक्षात आलं आहे की, समाजव्यवस्थेत आनेक प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न आणि आरक्षणाचा विषय संसदेत नेला पाहिजे. सर्व जाती धर्माच्या कार्यकर्त्यांनी मला निवडणूक लढवण्याचा आग्रह केला, सर्वजण मला म्हणाले की तुम्ही आता संसदेत गेलं पाहिजे. देशात तरुणांचे प्रश्न आहेत, शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत, महिला संरक्षणाचा आणि वेगवेगळ्या समाजांच्या आरक्षणाचा प्रश्न आहे. हे सर्व प्रश्न सभागृहात मांडले तर त्याला अधिक बळकटी येईल. यासाठी सर्वांनी मला आग्रह केला आणि मीदेखील त्यांच्या विनंतीला मान देऊन निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

विनोद पाटील यांना शिवसेनेच्या शिंदे गटाकडून लोकसभेचं तिकीट दिलं जाणार असल्याची चर्चा आहे. याबद्दल पाटील यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर पाटील म्हणाले, माझी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर अशी राजकीय चर्चा जालू होती. त्या चर्चेवेळी इतरही मान्यवर तिथे उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांनी मला विचारलं होतं की तुझं निवडणुकीचं काय? त्यावर मी त्यांना म्हटलं आत्ता तरी काही नाही. आरक्षणाचा विषय मिटल्यावर मी लोकसभा निवडणूक लढवेन. विनोद पाटील यांनी काही वेळापूर्वी टीव्ही ९ मराठीशी बातचीत केली. यावेळी त्यांनी आगामी निवडणूक लढण्याबाबत सविस्तर माहिती दिली.

मराठा आंदोलक म्हणाले, छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेच्या शिंदे गटाचे चार आमदार आहेत. संभाजीनगरमध्ये गेल्या २५ ते ३० वर्षांपासून धनुष्यबणाला मतदान करण्याची परंपरा आहे. इथला हिंदू धर्मीय नागरिक परंपरेने शिवसेनेला मतदान करतो. इथल्या हिंदूसाठी दुसर कुठलंच चिन्ह नाही. त्यामुळे मला असं वाटतंय की, महायुतीत छत्रपती संभाजीनगरची जागा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सुटेल. ही जागा शिंदेंना सुटली आणि त्यांना वाटलं तर ते मला आशीर्वाद देतील. त्यांना मी योग्य उेदवार वाटलो तर ते मला उमेदवारी देतील.

**एकनाथ शिंदेंकडे पर्याय नाही?**

शिवसेनेत दोन गट पडल्यानंतर संयुक्त शिवसेनेतील ४० आमदार आणि १३ खासदार एकनाथ शिंदेंबरोबर गेले आहेत. तर १५ आमदार आणि ५ खासदार उद्धव ठाकरे यांच्याबरोबर आहेत. त्याचबरोबर शिवसेनेचे छत्रपती संभाजीनगरचे (आधीचं नाव औरंगाबाद) माजी खासदार चंद्रकांत खैरे हेदेखील ठाकरे गटात आहेत. एमआयएमच्या इम्तियाज जलील यांनी मागील निवडणुकीत चंद्रकांत खैरे यांचा अवघ्या काही मतांनी पराभव केला होता. परंतु, खैरे आता ठाकरे गटात असल्यामुळे एकनाथ शिंदे यांच्याकडे सध्याच्या घडीला या मतदारसंघात तगडा उमेदवार नाही. त्यामुळेच एकनाथ शिंदे विनोद पाटील यांना या मतदारसंघातून लोकसभेच्या रिंगणात उतरवण्याच्या तयारीत आहेत, असं बोललं जात आहे.

# बालिकेवर अत्याचार करणाऱ्याला १२ वर्षे कारावास; जिल्हा न्यायालयाचा निकाल

**सातारा :माणदेश एक्सप्रेस**

पाच वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करणाऱ्या संतोष आबासो भोईटे (वय ५२, रा. तडवळे संमत वाघोली, ता. कोरेगाव) याला विशेष जिल्हा सत्र न्यायाधीश के. व्ही. बोरा यांनी १२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

या खटल्याची थोडक्यात पार्श्वभूमी अशी, पाच वर्षांच्या पीडित बालिकेला २८ जुलै २०१६ रोजी आरोपी संतोष भोईटे याने 'तुला चॉकलेट देतो,' असे म्हणून तिच्या हातात १० रुपयांची नोट दिली. त्यानंतर तिला एका ठिकाणी नेऊन त्याने अत्याचार केला. हा प्रकार बालिकेने आईला सांगितल्यानंतर वाठार पोलिस ठाण्यात संतोष भोईटेवर पोक्सोसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणाचा तपास तत्कालीन सहायक पोलिस निरीक्षक एस. ए. निकम यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सुनावणीदरम्यान या खटल्यात एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. पीडित बालिका, तिची आई, न्याय वैद्यकीय प्रयोगशाळा तज्ज्ञ तसेच तपासी अधिकाऱ्यांनी सदर केलेला पुरावा या प्रकरणामध्ये महत्त्वाचा ठरला. घटनेवेळी पीडित बालिकेचे वय ५ वर्षांचे, तर आरोपीचे वय ४५ वर्षे होते. सध्या आरोपीचे वय ५२ आहे. न्यायालयापुढे आलेले पुरावे आणि साक्षी ग्राह्य धरून आरोपी संतोष भोईटे याला न्यायालयाने १२ वर्षे सश्रम कारावास तसेच २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी वकील मंजूषा तळवलकर यांनी काम पाहिले.

उपविभागीय पोलिस अधिकारी सोनाली कदम, तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र शेळके तसेच वाठार पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अशोक हुलगे यांच्या मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी हवालदार प्रकाश चव्हाण यांनी कामकाज पाहिले. या खटल्यात प्रॉसिक्यूशन स्कॉडचे पोलिस उपनिरीक्षक उदय दळवी, सुनील सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस फौजदार शशिकांत गोळे, पोलिस अंमलदार गजानन फरांदे, हवालदार मंजूर मणेर, हवालदार शेख, कॉन्स्टेबल राजेंद्र कुंभार, अमित भरते यांनी सरकार पक्षाला सहकार्य केले.



# केंद्र अन् राज्य घरकुलात विभागात सातारा अव्वल

**सातारा : माणदेश एक्सप्रेस**

अमृत महाआवास अभियान ग्रामीणमध्ये विभागस्तरावर केंद्राच्या प्रधानमंत्री आणि राज्य पुरस्कृत घरकुल योजनेत अव्वल स्थान मिळवत सातारा जिल्ह्याने २८ पैकी तब्बल १६ पुरस्कार मिळवले आहेत. याबद्दल पुण्यात विभागीय आयुक्तांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामुळे जिल्ह्याचा डंका पुन्हा वाजला आहे.

केंद्र तसेच राज्य शासनातर्फे पक्का निवारा नसणाऱ्या विविध समूहातील कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात येतो. ही घरकुल योजना चांगल्या पद्धतीने राबविण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. त्यासाठी पुरस्कारही दिला जातो. तर अमृत महाआवास अभियान ग्रामीण २०२२-२३ सुरू करण्यात आले आहे. याचा विभागस्तरीय निकाल नुक्ताच जाहीर झाला. यामध्ये पुणे विभागात सातारा जिल्ह्याने सर्वच पातळीवर यशाचा डंका वाजवला आहे.

सर्वोत्कृष्ट जिल्हे या प्रकारात प्रधानमंत्री आवास ग्रामीण आणि राज्य पुरस्कृत योजनेत सातारा जिल्ह्याने प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर सर्वोत्कृष्ट तालुके प्रकारात प्रधानमंत्री योजनेत जावळी, कऱ्हाड आणि सातारा तालुक्यांनी अनुक्रमे तीन क्रमांक प्राप्त केले. तसेच राज्य योजनेत महाबळेश्वर तालुक्याने प्रथम तर माणला तृतीय क्रमांक मिळाला आहे.

सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतींसाठीही पुरस्कार होते. यामध्ये प्रधानमंत्री योजनेत कऱ्हाड तालुक्यातील येळगाव आणि पाटणमधील भुडकेवाडीने प्रथम तर पाटण तालुक्यातीलच काठी ग्रामपंचायतीने दुसरा क्रमांक मिळवला. राज्य योजनेत पाटणमधील बोंद्री ग्रामपंचायत प्रथम क्रमांकावर राहिली आहे.

शासकीय जागा उपलब्धतेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना पुरस्कार देण्यात आला आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेत तीनही तालुके सातारा जिल्ह्यातील आहेत. कोरेगाव, सातारा आणि कऱ्हाड तालुक्यांनी अनुक्रमे क्रमांक मिळवला. तर वाळू उपलब्धतेत सर्वोत्कृष्ट कामगिरीत प्रधानमंत्री आणि राज्य पुरस्कृत योजनेतही पाटण तालुका प्रथम राहिला आहे.

या यशाचा गौरव सोहळा पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयात झाला. आयुक्त डॉ. चंद्रकांत पुंडलवार यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. यावेळी सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संतोष हराळे, पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी क्रांती बोराटे यांच्यासह विविध तालुक्यांचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी तसेच सरपंच उपस्थित होते.

# दुर्बिणीने शोधूनही माझ्या हाताला डाग सापडणार नाही: राजू शेट्टी यांचा दावा

**कोल्हापूर :माणदेश एक्सप्रेस**

सर्वसामान्य लोक माझ्या पाठीशी असल्याने दुर्बिणीने शोधूनही माझ्या हाताला डाग सापडणार नाही, असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी गुरुवारी येथे व्यक्त केले. राजू शेट्टी म्हणाले, नांदणी (ता. शिरोळ) येथील भुपाल माणगावे यांचा ९१ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांचा मुलगा राजेंद्र माणगावे यांचा दोन दिवसांपुर्वी फोन आला व त्यांनी सांगितले की २८ तारखेला वडिलांचा ९१ वा वाढदिवस कुटूंबियांच्यावतीने



साजरा करणार आहोत. आपण भेट घेऊन शुभेच्छा देऊन जावे. याप्रमाणे मी नांदणी येथील माणगावेकोडी मळ्यात शुभेच्छा देण्यासाठी गेलो.

राजू शेट्टी म्हणाले, आई वडील दोघानांही शुभेच्छा दिल्यानंतर त्यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त माणगावे कुटूंबीयाने लोकसभा निवडणुकीसाठी चक्क ९१ हजार रूपयांची लोक वर्गणी माझ्याकडे सुपुर्द केली. २००४ पासून हे कुटूंबीय सातत्याने चळवळीसोबत राहिले आहे. गत वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या नातवाच्या लग्नातही त्यांनी ५१ हजार रूपयांची देणगी दिली होती. आज वडिलांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा मुलगा राजेंद्र माणगावे यांनी ९१ हजार रूपयांची लोकसभा निवडणुकीसाठी लोकवर्गणी देऊन चळवळीस बळ देण्याचं काम केलं आहे. चळवळीवर प्रेम करणाऱ्या अशा लोकांमुळेच मी गेल्या ३० वर्षांपासून उजळ माथ्याने सांगत आलो की मी जन्माला आलो त्यावेळेस माझा हात स्वच्छ होता, ज्यावेळेस शेवटचा श्वास घेईन तेव्हा सुद्धा दुर्बिणीने शोधूनही माझ्या हाताला डाग सापडणार नाही, असा दावा राजू शेट्टी यांनी केला आहे.

# अत्यावस्थेत बिबट्याचा बछडा शिवारात आढळला, वनविभागाने घेतले ताब्यात; उपचार सुरू

**कऱ्हाड :माणदेश एक्सप्रेस**

तळबीड, ता. कऱ्हाड येथील शिवारात अत्यावस्थेत बिबट्याचा बछडा आढळून आला. वनविभाग आणि रेस्क्यू टीमने या बछड्याला ताब्यात घेऊन त्याच्यावर उपचार सुरू केले आहेत. उपचारानंतर त्याला नैसर्गिक अधिवासात सोडले जाणार असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले.

तळबीड गावच्या हद्दीत असलेल्या चव्हाण मळ्यात उसाच्या शेतामध्ये आज, शनिवारी सकाळी बिबट्याचा बछडा शेतकऱ्यांना दिसला. या बछड्याला चालता येत नव्हते. शेतकऱ्यांनी तातडीने याबाबतची माहिती वनविभाग आणि रेस्क्यू टीमला दिली. त्यानंतर परिक्षेत्र वनाधिकारी तुषार नवले, मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांच्यासह वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच रेस्क्यू टीमचे पथक त्याठिकाणी पोहोचले.

# गंगाधाम फेज दोनमध्ये भीषण आग

**पुणे : माणदेश एक्सप्रेस**



गंगाधाम फेज दोन सोसायटीत सातव्या मजल्यावर सदनिकेत आग लागल्याची घटना घडली. अग्निशमन दलाकडून एकाच कुटुंबातील पाच जणांची सुटका करण्यात आली. सात मजली इमारतीत सातव्या मजल्यावर चार खोल्या असलेल्या एका सदनिकेत आग लागली होती .मोठ्या प्रमाणात धूर निर्माण झाला होता. जवानांनी तातडीने धाव घेतली. पाण्याचा मारा सुरु करून आग विझवण्याचा प्रयत्न सुरु केला. त्याचवेळी आतमध्ये कोणी अडकले आहे का, याची खात्री केली. बाल्कनीमध्ये कुटुंबातील पाच जण अडकून पडल्याचे निदर्शनास आले.


यामध्ये एक ज्येष्ठ महिला, दाम्पत्य आणि त्यांची दोन लहान मुले होती . जवानांनी सर्वांची सुखरुप सुटका केली. अर्धा तासात आगीवर नियंत्रण मिळवले. सदनिकेत खोलीमध्ये असणाऱ्या पेटत्या दिव्यामुळे आग लागली असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला असून सदनिकेतील सर्व गृहपयोगी साहित्य पूर्ण जळाले. अग्निशमन दलाची मदत वेळेवर पोहोचल्याने अनर्थ टळला. इमारतीत असलेली स्थायी अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे अग्निशमन दलाच्या निदर्शनास आले. अग्निशमन दलाचे अधिकारी संजय रामटेके, प्रभारी अधिकारी कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वीस जवानांनी आग आटोक्यात आणून पाच जणांचे जीव वाचविले.

# खासदारांचा संपर्क नाही; ही विरोधकांची स्टंटबाजी:धैर्यशील माने

**कोल्हापूर : माणदेश एक्सप्रेस**

खासदारांचा जनसंपर्क घटला आहे. विकासकामे झाली नाहीत. अशी चर्चा विरोधक जाणीवपूर्वक करीत आहेत. ही विरोधकांची स्टंटबाजी आहे, अशा शब्दात खासदार धैर्यशील माने यांनी विरोधकांवर हल्लाबोल चढवला.२०२९ साली लोकसभा निवडणुकीत खासदार धैर्यशील माने यांनी मिळवला होता. त्यानंतर इतक्या कालावधीनंतर आज प्रथमच त्यांनी त्यांच्या निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला.

यावेळी खासदार धैर्यशील माने यांची जनतेशी नाळ तुटली आहे, अशी चर्चा होत असल्याकडे लक्ष वेधले. त्यावर ते म्हणाले, हा विरोधकांचा कांगावा आहे. माने घराण्याची समाजाशी कायमची नाळ जुळली आहे. त्यामुळे आत्तापर्यंत आम्ही बारा वेळा निवडणुका लढवल्या. त्यामध्ये लोकसभेच्या दहा निवडणुका लढवून आठ वेळा विजय मिळवला आहे. ही जनतेशी संपर्क असल्याची पोचपावती आहे. मी तर जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, खासदार अशारीतीने वर गेलो आहे ते केवळ जनतेच्या सहकार्यामुळेच. त्यामुळे विरोधकांच्या असल्या टीके कडे



लक्ष देण्याची गरज नाही.

**अधिक कामे ,सर्वाधिक निधी**

कोल्हापूर जिल्ह्यात खासदार म्हणून सर्वाधिक निधी आणण्यात मला यश आले आहे. आत्तापर्यंत ८२०० कोटी रुपयांची कामे केली आहेत, असा दावा करून धैर्यशील माने म्हणाले, माझ्या लोकसभा मतदारसंघात स्थानिक विकासाची कामे गतीने केली आहेत. याशिवाय, रत्नागिरी- हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग, शाहूवाडी ,शिरोळ येथे एमआयडीसी यासारखी मोठी कामे केली आहेत. अजूनही मोठ्या प्रमाणात कामे सुरूच आहे.

**इचलकरंजीला पाणी हवेच**

इचलकरंजी शहराच्या दूधगंगा पाणी योजनेला कागल मधून विरोध होत आहे. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी पर्यायी योजना देण्यात येईल असे म्हटले आहे . याबाबत खासदार माने म्हणाले, इचलकरंजी शहराची लोकसंख्या वाढत आहे. त्यासाठी शास्त्रोक्त पाणी पाहणी होऊनच इचलकरंजीला पाणी योजना मंजूर झाली आहे. इचलकरंजीला पुढील ४० वर्षे पाणी दिल्यानंतरही दूधगंगेमध्ये कायमचे पाणी राहणार आहे. मात्र त्याकडे जाणीवपूर्वक विरोध केला जात आहे. उद्या मुख्यमंत्र्यांकडे होणाऱ्या बैठकीत दूधगंगा पाणी योजना झालीच पाहिजे, यासाठी ठामपणे आग्रही राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# इचलकरंजीच्या पाणी योजनेची बैठक म्हणजे नाटक

**इचलकरंजी:माणदेश एक्सप्रेस**

इचलकरंजी शहराच्या सुळकूड पाणी योजनेबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयोजित केलेली बैठक म्हणजे केवळ नाटक होते. पाण्यासाठी तडफडणार्या पाच लाख जनतेची हि घोर फसवणूक आहे. योजनेचा पाठपुरावा कायम राहणार असून आता खासदार-आमदारांना विचारात न घेता लढा सुरुच राहिल, अशी भूमिका कृती समितीच्या वतीने मदन कारंडे यांनी शनिवारी व्यक्त केली.




राज्य शासनाने इचलकरंजीसाठी दुधगंगा पाणी योजना मंजूर केली आहे. दुधगंगा नदीकाठावरुन या योजनेला तीव्र विरोध होत असल्याने काल मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत समिती नियुक्त करुन एक महिन्यात अहवाल देण्याचे निर्देश दिले गेले.

याबाबत कारंडे म्हणाले, काळाच्या बैठकीत केवळ आपले राजकीय हित सांभाळण्यासाठी कागल व शिरोळ तालुक्यातील नेत्यांनी या योजनेला विरोध सुरु केला आहे. तथापि, इचलकरंजीतील खासदार,आमदार यांनी बोटचेपी भूमिका घेतली आहे. समितीकडून सुळकूड योजनेबाबत सकारात्मक भूमिका मांडल्यावरही त्याला विरोध होणार नाही याची खात्री कोण देणार ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. इचलकरंजीची ही योजनाच नाकारण्याचे राजकीय डावपेच यामध्ये दिसून आले आहेत, असेही कारंडे यांनी सांगितले.

ती कृती समिती कागदावर इचलकरंजी पाणी योजनेसाठी समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रतापवाडी व अजितदादा राष्ट्रवादी काँग्रेसचे इचलकरंजी शहर जिल्हाध्यक्ष विठ्ठल चोपडे अध्यक्ष असलेल्या दोन कृती समिती आहेत. आजच्या होगाडे यांच्या कृती समितीने घेतलेले निर्णय दुसऱ्या समितीला मान्य असणार का ? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर, दुसरी कृती समिती अस्तित्वात कोठे आहे. ती केवळ कागदावर आहे. त्यांच्यासोबत कोण आहेत ? असा प्रतिप्रश्न कारंडे यांनी उपस्थित केला. याचवेळी आमची कृती समिती ही महाविकास आघाडीची असल्याचा होणारा आरोप चुकीचा आहे. यामध्ये विविध पक्ष, सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग असल्याचा दावाही त्यांनी केला.

# कवठेपिरानची सूरज पाटील टोळी हद्दपार, ‘एसपी’ संदीप घुगेंचा सलामीलाच दणका

**सांगली : माणदेश एक्सप्रेस**

खून, दहशत, मारामारी, गांजा विक्रीचे गुन्हे दाखल असलेल्या सूरज संभाजी पाटील (वय २९) व अक्षय नामदेव पाटील (वय २७, रा. कवठेपिरान) या दोघांना सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केले. नूतन पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांनी सलामीलाच हा दणका दिला आहे.

कवठेपिरान येथील सूरज पाटील हा टोळीचा प्रमुख आहे. तो आणि अक्षय पाटील या दोघांविरूद्ध २०१७ ते २०२२ या कालावधीत खून, खुनानंतर पुरावा नष्ट करणे, मारहाण करणे, गांजा बाळगणे व विक्री करणे असे



वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. दोघेही कायद्याला जुमानत नव्हते.

सांगली ग्रामीण पोलिसांनी सूरज पाटील व अक्षय पाटील या दोघांविरूद्ध महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ५५ नुसार हद्दपारीचा प्रस्ताव अधीक्षक संदीप घुगे यांना सादर केला होता. अधीक्षक घुगे यांनी उपअधीक्षक अण्णासाहेब जाधव यांच्याकडे चौकशीसाठी प्रस्ताव पाठवला. उपअधीक्षक जाधव यांनी चौकशी करून दोघांविरूद्ध गुन्ह्याचा व सद्यस्थितीचा अहवाल अधीक्षक घुगे यांना सादर केला.

अधीक्षक घुगे यांनी सलग सुनावणी घेऊन नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करून टोळीप्रमुख सूरज पाटील व अक्षय पाटील या दोघांना सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केले. गुन्हेगारी टोळ्यांची दहशत मोडीत काढण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे. अधीक्षक घुगे, अप्पर अधीक्षक रितू खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषणचे निरीक्षक सतीश शिंदे, सांगली ग्रामीणचे निरीक्षक राजेश रामाघरे, उपनिरीक्षक सिद्धाप्पा रूपनर, अंमलदार अमर नरळे, दीपक घट्टे, मेघराज रूपनर, सुशिल म्हस्के यांच्या पथकाने कारवाईत सहभाग घेतला.

अधीक्षक घुगे यांनी कवठेपिरानच्या दोघांना हद्दपार केल्यानंतर यापुढे गुन्हे करणाऱ्या इतर टोळ्यांवर पोलिसांची करडी नजर ठेवण्यात आली आहे. या टोळ्या नेस्तनाबूत करण्यासाठी कडक कारवाई करण्यात येणार आहे.

# आयात उमेदवाराला उमेदवारी देणार असाल तर वेगळा विचार करावा लागेल, विलास लांडे यांचा अजित पवारांना इशारा

**पुणे :माणदेश एक्सप्रेस**

आयात उमेदवाराला शिरूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देणारा असाल तर काही गोष्टींचा विचार करून निर्णय घ्यावा लागेल, अशी सूचक प्रतिक्रिया भोसरी विधानसभेचे माजी आमदार, शिरूर लोकसभेसाठी इच्छुक असणारे विलास लांडे यांनी दिली आहे. २०१९ मध्ये झालेल्या शिरूर लोकसभेच्या निवडणुकीत अजित पवारांचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून त्यांच्या सांगण्यावरून अमोल कोल्हे यांचे मी प्रामाणिकपणे काम केलं. आतादेखील आयात उमेदवाराला उमेदवारी मिळणार असेल, तर काही गोष्टींचा विचार करावा लागेल, असा थेट इशारा विलास लांडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिला आहे.

विलास लांडे म्हणाले, गेल्या पंधरा वर्षांपासून मी इच्छुक आहे. २००९ पासून ते आजतागायत शिरूर लोकसभेसाठी इच्छुक आहे. काही गोष्टी नेत्यांच्या निर्णयानंतर बदलाव्या लागतात. तस वागावं लागतं. आगामी २०२४ शिरूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक आहे. यात राजकीय परिस्थिती उलटसुलट झाली आहे. २०१९ ला सुद्धा या मतदारसंघातून निवडणुकीची तयारी केली. चार महिने मतदारसंघात फिरलो. वातावरण निर्मिती केली. ऐनवेळी



राष्ट्रवादी पक्षात अमोल कोल्हे यांची एन्ट्री झाली. त्यांना उमेदवारी देण्यात आली. तरी अजित पवारांच्या शब्दामुळे त्यांचे प्रामाणिकपणे मी काम केले. एवढं सगळं केल्यानंतर आयात उमेदवाराला उमेदवारी देणार असतील तर काही गोष्टींचा विचार करून निर्णय घ्यावा लागेल, असा इशारा माजी आमदार विलास लांडे यांनी अजित पवारांना दिला आहे. त्यामुळे नेमकं राष्ट्रवादीकडून माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील की माजी आमदार विलास लांडे यांना उमेदवारी मिळणार हे बघणं महत्त्वाचं आहे.

विलास लांडे यांनी ताठरती भूमिका घेतल्याने राष्ट्रवादी अजित पवार गटापुढे पेच निर्माण होऊ शकतो. माजी आमदार विलास लांडे हे शरद पवार आणि अजित पवार यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. त्यांचा ३५ वर्षांपासूनचा राजकीय अनुभव आहे. असे असताना देखील आजतागायत त्यांचं खासदार होण्याचं स्वप्न पूर्ण होऊ शकलं नाही. २०१९ ला मिळालेल्या संधीने त्यांना ऐनवेळी हुलकावणी दिली. नुकतंच माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांनी पक्षाने आदेश दिल्यास राष्ट्रवादी पक्षाकडून शिरूर लोकसभा निवडणूक लढण्यास इच्छुक असल्याचं म्हटलं होतं. यामुळेच आता विलास लांडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

# पिंपरीतील ड्रग्ज प्रकरणी ‘त्या’ पोलीस उपनिरीक्षकाला अटक, आणखी काही जण तपासात निष्पन्न होण्याची शक्यता

**माणदेश एक्सप्रेस**

पिंपरी- चिंचवड शहरातील रक्षक चौकात दोन कोटींचे मेफेड्रोन ड्रग्ज नुकतेच आढळले होते. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात नमामी झा याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, आता या गंभीर गुन्ह्यात निगडी पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या विकास शेळके या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव समोर आले असून त्याला सांगवी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या घटने प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी विजय मोरे यांनी फिर्याद दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रक्षक चौक या ठिकाणी अज्ञात व्यक्तीकडून दोन कोटी दोन लाख रुपयांचे २ किलो ३८ ग्रॅम मेफेड्रोन ड्रग्ज जप्त करण्यात आले होते. या प्रकरणी नमामी झा याला अटक करण्यात



आली. या गंभीर घटनेची दखल घेऊन पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. तपासात पोलीस उपनिरीक्षक विकास शेळकेचे नाव पुढे आले असून ड्रग्जच्या या गंभीर गुन्ह्यात त्याचा सहभाग आढळला आहे. आरोपींना न्यायालयात घेऊन जाण्यात येत आहे. ड्रग्जच्या प्रकरणात थेट पोलिस उपनिरीक्षकाचाचा सहभाग असल्याने पिंपरी- चिंचवड पोलिसांत एकच खळबळ उडाली आहे. या ड्रग्जप्रकरणी आणखी खळबळजनक गोष्टी समोर येण्याची शक्यता आहे.

याप्रकरणी अंमली पदार्थ विरोधी पथक आणि सांगवी पोलिसांनी सखोल चौकशी आणि तपास करत आणखी ४३ किलो एमडी ड्रग्ज जप्त केले आहे. शुक्रवारी केलेल्या कारवाईत दोन किलो आणि आजच्या कारवाईत ४३ असे एकूण ४५ किलो एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले. या ड्रग्जची किंमत तब्बल ४५ कोटी रूपये इतकी आहे.

# भारत जोडो पेक्षा पक्ष जोडण्याचे काम करा, रामदास आठवले यांचा राहूल गांधी यांना टोला

**सातारा :माणदेश एक्सप्रेस**

राष्ट्रीय काँग्रेसचे अनेक मोठे नेते महायुतीत येत आहेत. पक्ष फुटत चालला आहे. त्यामुळे राहूल गांधी यांनी भारत जोडण्याचे सोडून स्वत:चा पक्ष जोडण्याचे काम करावे. जे लोक पक्ष सोडून चालले आहेत, त्यांना थांबवण्यासाठी थोडा वेळ द्यावा. देशभर फिरून त्यांना फारसा लाभ होणार नाही, असा टोला रिपाइंचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी लगावला.

सातारा येथे शासकीय विश्रामागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. रिपाइंचे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड, अण्णा वायदंडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री आठवले म्हणाले, महायुतीमध्ये लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जागावाटपाची चर्चा सुरू आहे. रिपाइंनेही सोलापूर आणि शिर्डी दोन जागांची मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. राज्यसभेत खासदार असलो तरी लोकसभा लढवावी, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. २००९ मध्ये शिर्डीतून माझा पराभव झाला होता. यावेळी शिर्डीतून पुन्हा निवडून यायचे असल्याचा मानस आठवले यांनी व्यक्त केला.

शिवसेना-भाजपा युती २७ वर्षे होती. २०१२ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत रिपाइं सोबत आल्यानंतर युतीची महायुती झाली. आता मोठे मित्रपक्ष





आल्यानंतर आमचे नाव कुठे येत नाही. रिपाइंचा मतदार इमानदार असून मी घेतलेल्या भुमिकेला पाठिंबा देणारा आहे. रिपाइं छोटा पक्ष असला तरी गावा-गावात कार्यकर्त्यांची फळी आहे. या कार्यकर्त्यांनाही संधी मिळावी, अशी अपेक्षा आठवले यांनी व्यक्त केली.

सातारा लोकसभेची जागा रिपाइंने मागितलेली नाही. सातारा लोकसभा भाजपाने लढावी, अशी आमची अपेक्षा असून खा. उदयनराजेंना उमेदवारी मिळाल्यास रिपाइं त्यांच्यासोबत असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले.

इंडिया आघाडीतून पंतप्रधान पदाच्या उमेदवार कोण याबाबत विचारले असता आठवले म्हणाले, त्या आ आघाडीत पंतप्रधान पदासाठी २० ते २५ उमेदवार आहेत. प्रत्येक पक्षाचा नेते इच्छुक आहे. नितीश कुमार महायतीत आले आहेत. ममता बॅनर्जी स्वतंत्र लढणार आहेत.

मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनांमुळे आरक्षण कार्यवाहीला गती आली. सरकारनेही मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. दहा टक्के आरक्षण देताना ओबीसीच्या आरक्षणालाही धक्का लागलेला नाही. त्यामुळे जरांगे-पाटील यांनी आता आंदोलनाची भाषा करू नये तर शांततेच्या मार्गाने मराठा समाजाचे नेतृत्व करावे, असे आवाहन आठवले यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची अनेक कामे प्रलंबीत होती. काँग्रेसला लक्ष द्यायला वेळ नव्हता. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध केला. इंदू मीलच्या ठिकाणी स्मारकाचे काम वेगाने सुरू असेही आठवले म्हणाले.

# खासदाराच्या होमपीचवर विरोधकांच्या जोर-बैठका!

## तासगावात विशाल पाटील कुटुंबियांच्या गाठीभेटी, चंद्रहार पाटील यांची मोर्चेबांधणी

**कवठे एकंद: माणदेश एक्सप्रेस**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळातील वातावरण चांगलेच तापले आहे. सध्याचे खासदार संजय पाटील यांच्या तासगावच्या होम पिचवर लोकसभा निवडणुकीतील त्यांच्या विरोधकांनी गाठीभेटीचा धडाका लावला आहे.

भारतीय जनता पक्षाचे खासदार संजय पाटील यांच्या राजकीय कारकिर्दीचा वाढता आलेख लक्षात घेता जिल्ह्याच्या राजकारणात त्यांच्या प्रत्येक गावात गट आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकास योजनांचा पाठपुरावा करताना त्यांनी स्वतःची वेगळी छाप कार्यकर्त्यांच्यावर टाकली आहे.



याच पाठबळावर संजय पाटील यांनी यंदा खासदारकीची हॅट्रिक करण्याचे मनसुबे आखले आहेत.

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या सांगली जिल्हयात वसंतदादा पाटील घराण्याचा चागलाच दबदबा होता. या पार्श्वभूमीवरच नातू विशाल पाटील यांनी पुन्हा नव्या उमेदीने खासदारकीसाठी शड्डू ठोकला आहे. विशाल पाटील यांनी बुधवारी खासदार पाटील यांच्या होमपीचवर म्हणजेच चिंचणी जिल्हा परिषद मतदार संघातील गावांना भेटी देत कार्यकर्ते व लोकांशी संवाद साधला. जुन्या - नव्या काँग्रेस आय, राष्ट्रवादी काँग्रेस , अन्य समविचारी पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन केंद्र सरकारच्या कारभारावर टीका करीत खासदारांच्या निष्क्रियतेवर बोट ठेवले. त्यांच्या कुटुंबियांनीही विविध गावागावत गाठीभेटी सुरू केल्या आहेत.

पैलवानाचा राजकीय आखाड्यात शड्डू...

दुहेरी महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील राजकीय आखाड्यात शड्डू ठोकण्याचे निश्चित केले आहे. गावच्या यात्रेतील कुस्ती मैदाने, बैलगाडी शर्यती व रक्तदान शिबिरे असे विविध सामाजिक उपक्रम राबवून लोकांशी संवाद वाढवला आहे. तासगाव तालुक्यातील सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभाग वाढवला आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य, तसेच कार्यकर्त्यांच्या वाढदिवसाच्या किंवा अन्य कार्यक्रमानिमित्ताने त्यांनी गाठीभेटी सुरू ठेवल्या आहेत.

वंचित बहुजन आघाडीकडून चाचपणी...

लोकसभा निवडणुकीत यापूर्वी वंचित बहुजन आघाडीने मोठ्या प्रमाणात मताधिक्य घेतले होते. त्यामुळे जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीने ही उमेदवार चाचपणी सुरू केली आहे. कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या आहेत. एकूणच लोकसभेच्या निमित्ताने खासदार संजय काका पाटील यांना शह देण्यासाठी विशाल पाटील व चंद्रहार पाटील यांनी बैठकावर जोर लावला आहे.

# विहिरीत चप्पल तरंगताना दिसली अन् कळले विवाहितेने आत्महत्या केली; चौघांवर गुन्हा

**कऱ्हाड : माणदेश एक्सप्रेस**

विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी आटके, ता. कऱ्हाड येथील चौघांवर कऱ्हाड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश नंदकुमार यादव (रा. भिलवडी स्टेशन, ता. पलुस) यांनी याबाबतची फिर्याद दिली आहे.

पती संदीप भगवान पाटील, सासरा भगवान पाटील, सासू पार्वती भगवान पाटील व नणंद दीपाली भगवान पाटील (सर्व रा. आटके, ता. कऱ्हाड) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. तर कोमल संदीप पाटील असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आटके येथील संदीप पाटील याचा भिलवडी स्टेशन येथील कोमल हिच्याशी १४ फेब्रुवारी २०१७ रोजी विवाह झाला होता.

विवाहानंतर दोन वर्षे सासरच्यांनी कोमलला चांगली वागणूक दिली. मात्र, त्यानंतर त्यांनी कौटुंबिक कारणावरून तिला शिवीगाळ, दमदाटी व मारहाण सुरू केली. जानेवारी २०२१ मध्ये तिच्याशी वाद घालून मारहाण केल्यामुळे कोमल माहेरी भिलवडी येथे गेली. त्यावेळी विश्रामबाग पोलिस ठाण्यातील समुपदेशन कक्षात तक्रार नोंदवून पती संदीपसह इतरांना समज देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही त्यांच्याकडून कोमलला त्रास दिला जात होता.

दरम्यान, २८ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास पती संदीप याने कोमलचा भाऊ आकाश याला फोन करून कोमल माहेरी आली आहे का, अशी विचारणा केली. तसेच ती घरात नसल्याचे सांगितले. त्यामुळे माहेरचे नातेवाईक तातडीने आटके येथे आले. त्यावेळी एका विहिरीत चप्पल पाण्यावर तरंगताना दिसली. ग्रामस्थांना संशय आल्यामुळे त्यांनी विहिरीत शोध घेतला असता कोमलचा मृतदेह आढळून आला.

सासरच्यांनी दिलेल्या शारीरिक, मानसिक त्रासामुळे कोमलने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची तक्रार आकाश यादव यांनी कऱ्हाड ग्रामीण पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप तपास करीत आहेत.

# कांदा उत्पादनातील राज्याची मक्तेदारी मोडीत?

**पुणे :माणदेश एक्सप्रेस**

किमतीतील चढउतारांमुळे सर्वच घटकांच्या व्यवहारांवर परिणाम घडवणारा कांदा हे महाराष्ट्रातील प्रमुख पीक. देशाच्या एकूण कांदा लागवड क्षेत्र आणि उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा नेहमीच मोठा राहिला आहे. मात्र, गेल्या वर्ष दीड वर्षांत ही मक्तेदारी मोडीत निघू लागली असून मध्य प्रदेश, कर्नाटक, गुजरात या राज्यांनी उत्पादनात मोठी झेप घेतली आहे. परिणामी उत्तर भारतातून असलेली कांद्याची मागणी घटत आहे.

गतवर्षी फेब्रुवारी महिन्यात कांद्याच्या दरात मोठी घसरण झाल्यामुळे राज्य सरकारने दर घसरण व उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी माजी पणन संचालक सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली होती. या समितीने आठच दिवसांत आपला अहवाल सादर केला होता. त्यानंतर राज्य सरकारने कांदापिकाला अनुदान जाहीर केले. मात्र, समितीचा अहवाल आजपर्यंत उघड करण्यात आलेला नाही.

या समितीने नोंदविलेल्या निरीक्षणानुसार, कांदा लागवडीखालील क्षेत्राची २०२१-२२ आणि २०२२-२३ या वर्षांशी तुलना करता मध्य प्रदेशात ३११ टक्के, कर्नाटकात ३२५ टक्के, गुजरातमध्ये १६७ टक्के आणि राजस्थानमध्ये २८६ टक्क्यांनी लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. याच काळात महाराष्ट्रातील लागवड क्षेत्र मात्र सव्वा लाख हेक्टरने घटल्याचे दिसून येते.

वरील चार राज्यांत लागवडीसह उत्पादनातही मोठी वाढ झाल्यामुळे त्या त्या राज्यातील स्थानिक मागणी स्थानिक उत्पादनावरच पूर्ण झाली आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये उत्पादित झालेला कांदा कमी वाहतूक खर्चात राजधानी दिल्लीसह उत्तर भारतातील बाजारपेठेत गेल्यामुळे राज्यात उत्पादित झालेल्या कांद्याच्या मागणीत मोठी घट झाली आहे. २०२२-२३मध्ये महाराष्ट्रात १३५ लाख टन, मध्य प्रदेशात १५१ लाख टन, कर्नाटकात १३५ लाख टन आणि गुजरातमध्ये ४१ लाख टन कांदा उत्पादन झाले आहे.

| | लागवड क्षेत्र (लाख हे.) | | एकूण उत्पादन (लाख मे. टन) | |
|---|---|---|---|---|
| | २१-२२ | २२-२३ | २१-२२ | २२-२३ |
| महाराष्ट्र | ९.२५ | ७.९५ | १३३ | १३५.३३ |
| मध्य प्रदेश | १.९७ | ६.१३ | ४७.५० | १५१.१६ |
| कर्नाटक | २.३२ | ७.५५ | २८.०० | १३५.६० |
| गुजरात | १.०० | १.६७ | २६.०० | ४१.५९ |

धोरणसातत्याअभावी निर्यात विस्कळीत

नाशिक परिसरातील बाजार समित्या आणि स्थानिक बाजारपेठ मुख्यत: निर्यातीवर अवलंबून आहे. मागील तीन वर्षांपासून करोना, निर्यातबंदी आणि शेजारील देशांमध्ये निर्माण झालेल्या आर्थिक संकटांमुळे कांदा निर्यात विस्कळीत झाली आहे. बांगलादेश कांद्याचा मोठा आयातदार आहे. पण आयातीवर कर लावला आहे. नेपाळ, श्रीलंका आर्थिक संकटात असल्यामुळे अपेक्षित निर्यात झाली नाही. त्यामुळे समितीने शेजारील आणि मित्र देशांमध्ये कांदा निर्यातीचे आर्थिक व्यवहार रुपयांमध्ये करावेत,



अशी शिफारस केली आहे.

पाच वर्षांत लागवड क्षेत्र दुप्पट

सन २०१८-१९मध्ये राज्यातील एकूण क्षेत्र ४.५० लाख हेक्टर होते, तर उत्पादन ८०.४७ लाख टन होते. सन २०२१-२२ मध्ये लागवड क्षेत्र ९.२५ लाख, तर २०२२-२३मध्ये लागवड क्षेत्र ७.९५ लाख हेक्टरवर जाऊन एकूण उत्पादन सुमारे १३५ लाख टनांवर गेले आहे. २०१८-१९ च्या तुलनेत २०२२-२३मध्ये लागवड क्षेत्र आणि उत्पादनात दुपटीने वाढ झाली आहे. एकीकडे लागवड आणि उत्पादनात वाढ होत असताना देशांतर्गत मागणीत मात्र वेगाने घट झाली आहे आणि निर्यातही विस्कळीत झाली आहे. त्यामुळे राज्यात कांदा मातीमोल झाल्याचे निरीक्षण समितीने नोंदविले आहे.

# महाराष्ट्रातील माजी मंत्र्याला उत्तर प्रदेशमधून उमेदवारी

**नवी दिल्ली : माणदेश एक्सप्रेस**

२०२४ लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने पहिली यादी आज शनिवारी २ मार्च रोजी जाहीर झाली. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी राजधानी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही यादी जाहीर केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा वाराणसीतून निवडणूक लढणार असल्याचे त्यांनी सांगितले. भाजपने पहिल्या यादीत १९५ उमेदवारांची घोषणा केली आहे. तर महाराष्ट्रातील एका नेत्याला उत्तर प्रदेशमधून उमेदवारी मिळाली आहे. ते म्हणजे, माजी गृहराज्यमंत्री कृपाशंकर सिंह यांना उत्तर प्रदेशमधील जैनापूर येथून लोकसभेसाठी उमेदवारी जाहीर झाली आहे. ज्यांना उमेदवारी देण्यात आली आहे, त्यात एक लोकसभेचे अध्यक्ष आणि दोन राज्यांचे मुख्यमंत्र्यांना संधी दिल्याचे तावडे यांनी सांगितले. भाजपच्या पहिल्या यादीत महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराचा समावेश नाही. पहिल्या यादीत ज्या प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे त्यात वाराणसीमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गांधीनगरमधून अमित शहा, उत्तर गोव्यातून श्रीपाद नाईक यांचा समावेश आहे. पहिल्या यादीत २८ महिलांना उमेदवारी देण्यात आली आहे.